गुरुवार, दि. १ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २६७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## सरकारचा जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय

**नवी दिल्ली -** केंद्र सरकारच्या कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटकल अफेअर्सच्या बैठकीत मोठा निर्णय घेतला गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून देशभर चर्चेत असलेल्या जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी सरकारनं येत्या काळात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयासंदर्भातील माहिती दिली. जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचं स्वागत काँग्रेसकडून देखील करण्यात आलं आहे.

भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०२१ ला जनगणना होणं अपेक्षित होतं, मात्र त्यावेळी करोना संसर्गामुळं जनगणना करण्यात आली नव्हती. आता यापुढं जी जनगणना होईल ती जातनिहाय जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना जातनिहाय जनगणनेसंदर्भातील माहिती देताना काँग्रेसवर देखील टीका केली. काँग्रेसनं केवळ सर्वेक्षण करुन घेतल्याचं म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातींच्या गणनेचा आगामी जनगणनांमध्ये समावेश केला जाईल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय मानला जात आहे. अश्विनी वैष्णव म्हणाले की, १९४७ नंतर जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. काँग्रेसने पान ३ वर

### निःपक्षपातीपणाने जनगणना व्हावी - जरांगे पाटील


महाराष्ट्रात मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी या निर्णयावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. केंद्र सरकार जनगणना करत आहे चांगली गोष्ट आहे. इंग्रजांनी केलेली जनगणना आहे, त्यानंतर जनगणना झाली नाही. त्यामुळे दूध का दूध पाणी का पाणी होईल, किती संख्या आहे हे कळेल, असे जरांगे पाटील यांनी म्हटलं. तर, बांठिया आयोगाचा उल्लेख करत जनगणना करायची आवश्यकता सरकारला नसावी, असेही जरांगे यांनी म्हटलं. बाठिया आयोगाने आत्ताच रिपोर्ट दिला आहे, त्या शिफारशी जरी लागू केल्या तरी भागतं. जनगणना करण्याची आवश्यकता नाही. मात्र, सरकारची इच्छा आहे, तर केली तरी हरकत नाही, अशी भूमिका जरांगे पाटील यांनी मांडली. जो आयोग किंवा समिती गठीत केली जाईल, त्यातील लोक मात्र निपक्षपाती असावेत. नाहीतर फुगून आकडा सांगितला जायचा, त्यात सगळ्या जाती धर्माचे लोक पाहिजे. त्यांनी खरी संख्या समोर आणली पाहिजे, अशी मागणीही जरांगे पाटील यांनी केली. तसेच, आरक्षणाचा कोटा सुद्धा त्यांनी ७२ टक्क्यांपर्यंत करायला पाहिजे. त्यामुळे आरक्षण सर्वांनाच पुरेल, आमचं आरक्षण यांनी ७५ वर्षे खाल्ले, सरकारने निःपक्षपातीपणाने जनगणना करावी, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

### जातनिहाय जनगणनेसाठी केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय - भाऊसाहेब घुगे



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय हा सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेलं निर्णायक पाऊल असल्याची प्रतिक्रीया शिवसेने जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली आहे. या जनगणनेमुळे देशातील विविध जातींच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची अचूक माहिती उपलब्ध होणार असून, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांच्यासह सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि प्रभावी धोरणे आखता येणार आहेत. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि निवारा यांसारख्या मूलभूत सुविधांचा लाभ खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचवण्याचा मार्ग या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. हा निर्णय सामाजिक न्यायाची खरी जाणीव असलेल्या नेतृत्वाने घेतलेला आहे, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे आभारही श्री घुगे यांनी मानले.

### जातनिहाय जनगणनेमुळे सर्वांना समान न्याय मिळेल - आमदार खोतकर



केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय मोठा असून त्यामुळे सर्वांना समान न्याय मिळेल, अशी प्रतिक्रिया आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली. जातनिहाय जनगणना करावी अशी सर्वच समाजातून मागणी होती. अशी जनगणना झाल्यानंतर सर्व समाजाला शैक्षणिक आणि नोकरीत जातनिहाय टक्केवारीनुसार संधी मिळेल. यामुळे दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल. सत्तेवर आल्यास जनगणना करू, अशी ग्वाही काँग्रेसच्या वतीने राहुल गांधी यांनी दिली होती. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणना करणार असल्याची घोषणा करून काँग्रेस पक्षाला उघडे पाडले आहे. आपण या निर्णयाचे स्वागतच करतो,असेही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले आहे.

### युवा आदर्श

### पाटी मराठी ...

साजरी हो महाराष्ट्री
जल्लोषात रे पासष्ठी
विरोधाभास जाणता
मन होते दुःखी कष्टी
बनवले जातो चक्क
बदलून फक्त पाटी
राहिलो नावा पुरता
पाटीवर नाव मराठी
ठेच लागता आई गं
येई मातृभाषा ओठी
इतर वेळी इतरभाषा
मराठी रांगेत शेवटी
मराठीत बोललो तर
ठरलो जातो गावठी
बुध्दी भ्रष्ट झालेली
अशी आमची कवटी
कॉन्व्हेंटमधे घालावी
आधी आपली कार्टी
सुग्रास भोजन सोडून
चिवड फुके खरकटी
असेभाषा कुठलीही
असणार स्वल्प त्रुटी
नितळ तळाशी पहा
लाभेभौक्तीक कोटी
बहुभाषिक जरुर हो
इंग्रजी मिरव ललाटी
हृदय मंदिरात जागा
ठेवावी मराठी साठी
मिळे अभिजातदर्जा
बदलती सर्व चौकटी
सुखवे साक्षात विठ्ठल
रे कर ठेवलेला कटी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### पालकमंत्री पंकजा मुंडे आज जालन्यात

**जालना -** राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे बुधवार, दि. ३० एप्रिल, २०२५ रोजी रात्री ९.३० वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. तसेच गुरुवार, दि. १ मे, २०२५ रोजी सकाळी ७.४५ वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथून वाहनाने पोलीस मुख्यालय, मैदानाकडे प्रयाण करतील. सकाळी ८.०० वाजता पोलीस मुख्यालय, मैदान येथे आगमन व महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम उपस्थित राहतील. तसेच सकाळी ८.३० वाजता जालना येथून वाहनाने परळी वैजनाथ, जि. बीडकडे प्रयाण करतील.

तसेच पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे शनिवार, दि. ३ मे, २०२५ रोजी दूपारी २ वाजता जालना येथे आगमन होणार आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथे विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थित राहणार आहेत. सायं. ५.१५ वाजता जालना येथून चिकलठाणा विमानतळ छत्रपती संभाजनगरकडे प्रयाण करतील.

### मनिषा नागवे हिचे यश



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने जानेवारी २०२५ मध्ये घेतलेल्या बीपीटीएच अभ्यासक्रमाचा तृतीय वर्षाचा निकाल नुकताच जाहिर झाला असून या परीक्षेत मनिषा गजानन नागवे हिने महाविद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. मनिषाने सर्वाधिक ७३.२० टक्के गुण संपादन केले आहेत. आंबेवाडी येथील धरती जनसेवा प्रतिष्ठानच्या ओजस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयात मनिषा ही शिक्षण घेत आहे. विशेष म्हणजे मनिषा हिने प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेतही प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. या यशाबद्दल तिचे अभिनंदन होत आहे.

### भुमिपुजनानंतर रस्त्याचे काम थंड बस्त्यात; सांडपाणी रस्त्यावर




**जालना । प्रतिनिधी -** गेल्या सव्वा महिन्यांपुर्वी शहरातील वाल्मिक नगर ते बायपास रस्त्याच्या कामाचे उदघाटन करण्यात आले होते. हा रस्ता गांधीनगर भागातून जातो. भुमिपूजनानंतर रस्ता केवळ खोदून ठेवल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत आहे. परिणामी गांधीनगर वासियांचे आरोग्य धोक्यात आले असून रस्त्यावरून जाणे-येण्यासह त्रास होत आहे. रस्त्याचे काम थंड बस्त्यात पडले आहे. या रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्याची मागणी या भागातील नागरिकांनी जालना शहर महानगर पालिकेच्या आयुक्तांकडे एका निवदेनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्र १९ वाल्मिकनगर ते रिंग रोड सिमेंट रस्ता विकासकामाचे भूमिपूजन होऊन सव्वा महिना झालेला आहे. सदर रस्ता गुत्तेदाराने संपूर्ण खोदून ठेवला आहे. त्यामुळे रस्त्यावर प्रचंड प्रमाणात घाण झालेली आहे. सांडपाणी रस्त्यावर आलेले आहे. या सांडपाण्यात मोठ्या प्रमाणात डास निर्माण झालेले आहे. अंत्यविधीसाठी जाण्यासाठीही याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधीत गुत्तेदारास या भागातील रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर लक्ष्मी सरोदे, शकिला सय्यद, सुदर्शन सरोदे, अनिस शेख, समद कुरैशी, डॉ. आसेफ शेख, जर्नादन घोडके, संजय अंबेकर, शेख अतिक, जहीर खान, जगदिश सातपुते, आनंद जाधव, रोहीत शेळके, उमेश केंधळे, आकाश पवार, गोपीचंद देवरे, वसीम शेख, अरबाज शेख, फरदीन शेख, अफसर शेख, मस्जिद तांबोळी, युसूफ शेख, आंनद वाघमारे, खाजा शेख, कम्मु शेख, सोहेल शेख, उमेश ठोंबरे, हबीब बागवान, शेख मोहबीस, सलीम शेख, शेख अशफाक, शंकर सुर्यवंशी, कृष्णा देवरे, बाबा शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### आमदार साहेब... जरा इकडेही लक्ष द्या...

निवडणुकीपुर्वी जालनेकरांना एक दिवसआड पाणी देण्याचे आश्वासन आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिले होते. त्यासाठी ते प्रयत्नशिल आहेत. तर दुसरीकडे साधारण सव्वा महिना पहिले मोठ्या दिमाखात आमदार खोतकर यांनी ज्या रस्त्याचे भूमिपूजन केले होते. तो रस्ता केवळ खोदून ठेवल्यामुळे नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. आ. अर्जुनराव खोतकर यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन हा रस्त्याचे काम तात्काळ सुरु करावे अशी मागणी होत आहे.

## वेव्हज् परिषदेच्या उद्घाटनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत

**मुंबई । प्रतिनिधी -** भारताच्या पहिल्या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन (वेव्हज्) शिखर परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ मे रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होणार आहे. या वेव्हज् परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रिज या घोषवाक्याखाली होणाऱ्या या चार दिवसीय शिखर परिषदेत भारताला मीडिया, मनोरंजन आणि डिजिटल नवप्रवर्तनाचे जागतिक केंद्र म्हणून प्रदर्शित करण्यात येईल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि प्रतिभेच्या एकत्रीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असलेल्या या वेव्हज् २०२५ मध्ये चित्रपट, ओटीटी, गेमिंग, कॉमिक्स, डिजिटल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता, एव्हीजीसी- एक्सआर ब्रॉडकास्टिंग आणि नव्या तंत्रज्ञानाचा समावेश असेल. भारताच्या मीडिया आणि मनोरंजन क्षेत्रातील सामर्थ्याचे हे सर्वांगीण प्रदर्शन असेल. या उपक्रमाच्या माध्यमातून २०२९ पर्यंत ५० अब्ज डॉलर्सच्या बाजारपेठेचे दरवाजे उघडले जातील, असा अंदाज आहे.

या शिखर परिषदेत प्रथमच ग्लोबल मीडिया डायलॉग (GMD) चे आयोजन मुंबईत होणार आहे. यामध्ये २५ देशांचे मंत्री सहभागी होणार असून, भारताच्या जागतिक मीडिया क्षेत्रातील सहभागात हा एक ऐतिहासिक टप्पा ठरेल. वेव्हज् बजार या जागतिक ई-मार्केटप्लेसमध्ये ६,१०० पेक्षा अधिक खरेदीदार, ५,२०० विक्रेते आणि २,१०० प्रकल्प सहभागी होणार आहेत, ज्यातून स्थानिक व जागतिक स्तरावर व्यवसाय आणि नेटवर्किंगच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत.

या परिषदेत प्रधानमंत्री क्रिप्टोस्पियरला भेट देऊन क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत निवड झालेल्या सर्जनशील कलाकारांशी संवाद साधणार आहेत. याशिवाय, ते भारत पॅव्हिलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियनला देखील भेट देतील. या स्पर्धेसाठी पान ३ वर

# संपादकीय

## कामगारांचा हक्काचा दिवस


१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. जगभरातील कामगारांचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. केवळ भारतातच नाही तर जगभरातील ८० हुन अधिक देशात या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर जगभरातील कामगारांना रोजगार मिळू लागला. रोजगार मिळाला पण कामगारांची पिळवणूक मात्र वाढली. कोणत्याही सुविधा न देता तुटपुंजी मजुरी देत कामगारांना १२ ते १४ तास राबवून घेण्यात येऊ लागले. त्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला. या असंतोषातूनच कामगार एकत्र आले व कामगार संघटनांची निर्मिती झाली. या संघटनांनी कामगारांची पिळवणूक थांबवण्यासाठी काही ठराव केले. त्या ठरावात केलेल्या प्रमुख मागण्या कायद्याने आठ तासांचा दिवस, लहान मुलांना कामावर लावण्यास बंदी, महिला कामगारांच्या कामावर मर्यादा, रात्रीचे व धोक्याचे काम यासाठी खास नियम, कायद्याने साप्ताहिक सुट्टी, कामाचा मोबदला वस्तूरूपाने न देता नगद द्यावा, समान कामासाठी समान वेतन या मागण्या २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांकडून करण्यात आल्या. ऑस्ट्रेलियातील कामगारांच्या मार्गाने जात अमेरिका व कॅनडातील संघटनांनी १ मे १८८६ रोजी मोर्चे व धरणे आंदोलनाची सुरवात केली. अशाच एका मोर्चाला पांगवताना ४ मे १८८६ रोजी झालेल्या गोळीबारात १ आंदोलनकारी ठार झाला. त्याचा निषेध म्हणून जगभरातील कामगार संघटना रस्त्यांवर उतरल्या. त्यात एका अज्ञात व्यक्तीने पोलिसांवर बाँब टाकला. यात ८ पोलीस मृत्यू पावले, तर ५० पोलीस जखमी झाले. या घटनेच्या स्मरणार्थ १ मे १८८९ रोजी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी रेमंड लेविन याने पॅरिस येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत केली. त्या परिषदेत १ मे १८९० हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याचे निश्चित झाले. १८९१ च्या दुसऱ्या परिषदेत १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून साजरा करण्याची औपचारिक घोषणा करण्यात आली. तेंव्हापासून १ मे हा जागतिक कामगार दिन म्हणून जगभरात उत्साहात साजरा केला जातो. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, मानवाकडून मानवाचे होणाऱ्या पिळवणुकीचा अंत करण्याचा प्रतीक बनला आहे. १९०५ च्या १ मे या कामगार दिनाच्या पत्रिकेत लेनिनने लिहिले आहे, कामगार - कामगारात, राष्ट्रा - राष्ट्रात, धर्मा - धर्मात असणारे शत्रुत्व नष्ट करा. या शत्रुत्वाने फक्त लुटारुंचा आणि जुलूमशहांचा फायदा होतो. कारण ते कामगार वर्गातील अज्ञातावर आणि दुफळीवरच जगत असतात. ज्यू आणि ख्रिश्चन, फिन आणि स्वीडिश, आर्मेनीयम आणि तातार, पोलिश आणि रशियन, लॅटिन आणि जर्मन असे सारे भेदभाव विसरून समाजवादाच्या झेंड्याखाली आपण सारे आगेकूच करूया. सर्व देशातील कामगारांची ही ऐक्य शक्ती आंतरराष्ट्रीय समाजवादाची संघशक्ती १ मे ला आपल्या दलाची पाहणी करते आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यासाठीचा लढा निर्धाराने आणि अविचलपणे पुढे नेण्यासाठी आपले बळ संघटित करते. लेनिनचा हा विचार घेऊन जगभरातील कामगार संघटना आज मार्गक्रमित करीत आहेत. आज जगभरातील कामगार संघटनांपुढे नवे आव्हाने आहेत. जागतिकीकरणाची लाट व २१ व्या शतकातील कामगारांचे प्रश्न, बदललेली परिस्थिती, मस्तवाल झालेले भांडवलदार या नव्या आव्हानांचा मुकाबला कामगार संघटनांना करावा लागणार आहे. काळाचे हे आव्हान कामगार संघटनांनी स्वीकारले पाहिजे. जनतेच्या जगण्याला व कामगारांच्या हक्काला मिळालेले हे आव्हान आहे. याचा मुकाबला संघटित व असंघटित कामगारांच्या एकजुटीनेच होऊ शकतो. कामगार एकजुटीचा विजय असो!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# 'वेव्हज २०२५'; माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

**मुंबई-** देशातील माध्यम व मनोरंजन क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'वेव्हज २०२५' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वांद्रे कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. १ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही या परिषदेत सहभाग असणार आहे.




मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः मुंबईला हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर म्हटले जाते. मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई देशात अग्रगण्य शहर आहे. गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणुकीतही आघाडीवर आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई आघाडीवर राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी १ मे २०२५ रोजी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे २०२५ रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र - 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'कडे वाटचाल**

बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'वेव्हज २०२५' च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील १०० पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

**माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच**

'वेव्हज २०२५' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (चए) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

**परिषदेतील एक विशेष आकर्षण 'WVES बाजार'**

'WVES बाजार' - एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

**परिषदेत काय असणार?**

परिषद सत्रे - जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील.

मीडिया मार्केटप्लेस - भारताच्या माध्यम व मनोरंजन (चए) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन.

तंत्रज्ञान प्रदर्शन - नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो.

सांस्कृतिक कार्यक्रम - भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.

जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पर्व ठरणारी 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अ‍ॅण्ड एंटरटेनमेंट समिट (थतएड) २०२५' भारताला जागतिक पातळीवर 'कंटेंट सुपरपॉवर' म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी एक सुवर्ण संधी ठरणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनानुसार भारताने क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये आघाडी घेत असून नेहमीप्रमाणे मुंबईने क्रिएटिव्ह इकॉनॉमीचे नेतृत्व करायला तयार आहे. 'वेव्हज २०२५' ही केवळ एक शिखर परिषद नाही, तर भारताच्या सर्जनशील शक्तीला, जागतिक गुंतवणुकीला आणि धोरणात्मक बदलांना चालना देणारा परिवर्तनशील क्षण आहे. भारताने याचा उपयोग करून जागतिक कंटेंट क्षेत्रावर आपला ठसा उमटवावा, अशी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांची अपेक्षा आहे.

**'वेव्हज २०२५' : का आहे ही परिषद खास?**

भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन (चशवळर एपींशीींरळपाशपीं - चए) उद्योग हा वेगाने प्रगत होत असलेला आणि रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. जढढ, ॲनिमेशन, गेमिंग, तऋद्ध, चित्रपट, संगीत, आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात भारताने गेल्या दशकात विक्रमी प्रगती केली आहे. ऋखउउख-एध रिपोर्टनुसार, २०२४ मध्ये भारतीय माध्यम आणि मनोरंजन उद्योगाची किंमत २८ अब्जच्या पुढे गेली असून, २०२५ पर्यंत तो ३४ अब्ज गाठेल असा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर 'वेव्हज २०२५' ही परिषद केवळ चर्चासत्रांचे व्यासपीठ नसून, भारतातील सृजनशील उद्योगक्षेत्राला जगभरातील गुंतवणूक, सहकार्य, आणि नवकल्पनांशी जोडणारा सेतू ठरणार आहे.

**भारत - सृजनशील महासत्ता होण्याच्या वाटेवर**

भारतात सध्या दरवर्षी २,००० पेक्षा अधिक चित्रपट तयार होतात, ज्यात २० पेक्षा अधिक प्रादेशिक भाषा समाविष्ट असतात. जढढ प्लॅटफॉर्मवर भारतीय कंटेंटची मागणी केवळ देशातच नव्हे तर अमेरिका, युरोप, मिडल ईस्ट आणि दक्षिण आशियाई देशांमध्येही वाढत आहे. या मागणीचा फायदा घेत, भारताने 'कंटेंट एक्स्पोर्ट हब' होण्यासाठी पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. WVES २०२५ या दिशेने एक निर्णायक टप्पा ठरेल. ही परिषद केवळ संवादाचा नव्हे, तर कृतीशील धोरणनिर्मितीचा केंद्रबिंदू ठरेल, जिथून भारताची माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील भविष्यातील दिशा ठरवली जाईल. ऑस्कर, कान्स, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम, दावोसच्या धर्तीवर वेव्हज्चेही दरवर्षी आयोजन 'वेव्हज' ही परिषद केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने होत आहे. वेव्हजला कायमस्वरूपी एक सचिवालय स्वरूपात पुढे नेण्यात येणार आहे. या परिषदेस एक कायमस्वरूप देऊन दरवर्षी हा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्याप्रमाणे ऑस्कर, कान्स किंवा दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम सारखा आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयोजन केले जाते, अगदी त्याचप्रमाणे वेव्हज याचेही दरवर्षी आयोजन केले जाणार आहे. यासाठी एक समर्पित टीम वर्षभर काम करणार आहे.

**वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश होणार सहभागी**

सध्या तंत्रज्ञानाचे युग असून ते बदलणारे आहे. या नवीन बदलत्या तंत्रज्ञानाचे नेतृत्व महाराष्ट्राने करावे, यावर जोर देण्यात येत आहे. दृकश्राव्य तसेच मनोरंजन क्षेत्रात क्रियेटिव्ह इकॉनॉमीला एक प्लॅटफॉर्म देण्यात येणार आहे. मुंबई येथे होणाऱ्या या वेव्हज परिषदेस १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहेत. हा कार्यक्रम यापूर्वी झालेल्या जी २० पेक्षा खूप मोठा असणार आहे.

**वेव्हज समिटची वैशिष्ट्ये आणि महत्त्वाचे घटकः**

'क्रिएट इन इंडिया' वर भरः मेक इन इंडिया' पाठोपाठ आता 'क्रिएट इन इंडिया' ही नवी संकल्पना थतएड समिटद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवर पुढे नेली जाईल.

सर्जनशील प्रतिभेला व्यासपीठः भारतातील प्रादेशिक भाषांतील कंटेंट, ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्रातील नवोदित निर्माते आणि कलाकारांना जागतिक प्लॅटफॉर्मवर आपली कला सादर करण्याची संधी.

ग्लोबल सहयोग आणि भागीदारीः छशींषश्रळु, ाेप, उळीपशू+, डेपू झळर्लीीशी यांसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारीसाठी मार्ग मोकळे होतील.

तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांचा संगमः एआय, वर्च्युअल प्रोडक्शन, आणि इंटरॅक्टिव कंटेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर सखोल चर्चा.

धोरणात्मक चर्चासत्रेः धोरणकर्ते, गुंतवणूकदार, कलाकार, तंत्रज्ञ आणि उद्योगपती यांच्यात थेट संवादाची संधी.

क्रिएट इन इंडिया चॅलेंज - जगभरातील नवोदित निर्मात्यांच्या प्रतिभेचा अविष्कार साजरा करणारा एक अभूतपूर्व उपक्रम, अर्थात मुंबईत होणाऱ्या वेव्हज २०२५ मध्ये आपल्या प्रतिभेची झलक दाखवण्यासाठी 'वेव्हज' हे एक आघाडीचे व्यासपीठ म्हणून सज्ज आहे.

वेव्हेक्स २०२५ - हा उपक्रम एक मैलाचा दगड ठरणार असून यामाध्यमातून मीडिया-टेक स्टार्टअप्स त्यांच्या नवकल्पना आघाडीच्या उद्योग धुरिणांसमोर आणि सेलिब्रिटी एंजल गुंतवणूकदारांसमोर सादर करतील, ज्यामुळे भारताच्या माध्यम आणि मनोरंजन परिसंस्थेच्या भविष्याला नवीन दिशा मिळेल.

वेव्हज बाजारः चित्रपट, गेमिंग, संगीत, जाहिरात आणि एक्सआर, निर्माते, गुंतवणूकदार आणि इतर व्यवसायांना जोडणारी एक अद्वितीय जागतिक बाजारपेठ. यातूनच उद्योग व्यावसायिकांना उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडण्याच्या संधी देखील देते.

मास्टरक्लासेस आणि परस्परसंवादी सत्रे - उद्योगातील दिग्गज आणि जागतिक नेत्यांकडून शिकण्याची, माध्यम, मनोरंजन आणि तंत्रज्ञानाच्या भविष्याबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्याची एक दुर्मिळ संधी.

# जय जय महाराष्ट्र माझा...

दरवर्षी एक मे रोजी आपण महाराष्ट्र दिन साजरा करत असतो. महाराष्ट्र दिन हा १ मे १९६० रोजी साजरा होण्यामागे एक मोठा इतिहास आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतात भाषिक आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठी भाषिक लोकांनी स्वतःच्या स्वतंत्र राज्यासाठी जोरदार चळवळ उभी केली, जी संयुक्त महाराष्ट्र चळवळ नावाने ओळखली जाते.

राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारल्याने मराठी लोकांचा संताप झाला. याच्या विरोधात अनेक सभांमधून निषेध केले जात होते. सरकारचा निषेध करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबईतील फ्लोरा फाउंटन परिसरात कामगारांचा एक मोर्चा काढण्यात आला. या विशाल मोर्चात गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. पोलिसांनी मोर्चा उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज केला. मात्र तरीही मोर्चा शांत झाला नाही. अखेर मुख्यमंत्री मोरारजी देसाई (चेीरीक्षळ ऊशीरळ) यांनी पोलिसांना गोळीबार करण्याचे आदेश दिले. या गोळीबारात १०६ आंदोलक हुतात्म झाले.

महाराष्ट्र राज्याच्या मागणीसाठीच्या आंदोलनापुढे अखेर सरकारला झुकावे लागले आणि अखेर २५ एप्रिल १९६० रोजी भारतीय संसदेत बॉम्बे पुनर्रचना कायदा करण्यात आला आणि महाराष्ट्र आणि गुजरात अशा दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. हा कायदा १ मे १९६० रोजी अंमलात आणला.

ह्या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी १०६ जणांनी बलिदान दिले त्यांच्या स्मारकाची उभारणी १९६५ साली करण्यात आली. दरवर्षी १ मे रोजी मुंबईतील शिवाजी पार्कवर परेडचे आयोजन केले जाते. या हुतात्म्यांना मानवंदना दिली जाते.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. या नव्या राज्याची राजधानी मुंबई ठरली आणि यशवंतराव चव्हाण यांनी पहिले मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. या चळवळीत आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, सेनापती बापट, आणि एस. एम. जोशी यांसारख्या नेत्यांनी मोलाची भूमिका बजावली. हा दिवस मराठी भाषा आणि संस्कृतीच्या एकतेचा प्रतीक बनला आणि आजही तो अभिमानाने साजरा केला जातो.




महाराष्ट्राने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, आणि पेशव्यांसारख्या योद्ध्यांपासून ते सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांपर्यंत अनेक महान व्यक्ती दिल्या आहेत. या सर्वांनी महाराष्ट्राला जागतिक पातळीवर ओळख दिली आहे. महाराष्ट्र दिन हा तरुण पिढीला या संघर्षाची आठवण करून देतो आणि त्यांना आपल्या मुळांशी जोडतो. हा दिवस मराठी माणसाच्या एकतेचा आणि स्वाभिमानाचा संदेश देतो आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारा आहे.

महाराष्ट्राला संतांची एक समृद्ध परंपरा लाभली आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव,संत गोरोबा, संत मुक्ताबाई, संत रामदास,संत सावतामाळी, संत चोखामेळा आणि संत गाडगे महाराज यांसारख्या संतांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीत आणि समाजात एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे. त्यांनी आपल्या भक्ती, ज्ञान, आणि विचारांनी महाराष्ट्राला एक वेगळी ओळख दिली,विचार दिला आहे.

यांच्या सारख्या कित्येक महान संतांचे चरण आपल्या महाराष्ट्राला लाभले आहेत. आणि या महाराष्ट्राच्या मातीतून कित्येक थोर महात्मे जन्माला आलेले आहेत.

महाराष्ट्र दिन हा केवळ एक सुट्टीचा दिवस नाही तर मराठी माणसाच्या अस्मितेचा आणि अभिमानाचा उत्सव आहे. हा दिवस मराठी भाषा, संस्कृती, आणि परंपरांचा गौरव करतो. महाराष्ट्राची सांस्कृतिक संपन्नता ही त्याच्या विविधतेतून दिसून येते. गणेश चतुर्थी, दहीहंडी, आणि पंढरपूरची वारी यांसारखे सण, लावणी आणि पोवाडे यांसारखी नृत्यकला,पुरण पोळी,वांग्याचे भरित आणि कळण्याची भाकरी. वरण-बट्टी, मिसळ पाव, वडापाव यांसारखी खाद्यसंस्कृती ही महाराष्ट्राची ओळख आहे.

हा दिवस मराठी साहित्य आणि कलेचाही सन्मान करतो, कुसुमाग्रज यांसारख्या साहित्यिकांचे योगदान मोलाचे आहे. खांडेकर, पु.ल.देशपांडे, बालकवी, केशवसुत, महानोर, ना.घ.देशपांडे, असे साहित्यिक महाराष्ट्रात लाभले. भारतरत्न भीमसेन जोशी, लता मंगेशकर, सारखे कलाकार महाराष्ट्रात लाभले.

गड-किल्ल्यांनी वेढलेला आणि निसर्गरम्य सृष्टी सौंदर्य लाभलेला समुद्रकिनारा आहे.

अश्या या महाराष्ट्राला स्वतंत्र राज्याचा दर्जा १ मे १९६० रोजी देण्यात आला.

महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी झालेला संघर्ष मराठी माणसाच्या जिद्दीचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. मुंबईसह संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्यासाठी अनेकांनी आपले प्राण पणाला लावले. या चळवळीने मराठी भाषेला आणि संस्कृतीला एक नवीन ओळख दिली, आणि आज महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.

त्यामुळे हा दिवस मराठीपणाचा हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे स्मरण या दिवशी केले जाते. या दिवशी ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी राज्यात सार्वजनिक सुट्टी असते.

संपूर्ण जगभरात सहा हजारांच्या आसपास भाषा आहेत. त्यात मराठीचा क्रमांक सतरावा आहे आणि जगातली साडेचौदा कोटी लोक मराठी बोलतात, ही आनंदाची गोष्ट आहे.

महाराष्ट्र दिनासोबतच १ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणूनही ओळखला जातो. कामगारांच्या हक्कासाठी आणि न्याय्य वेतनासाठी सुरू झालेल्या चळवळीचा हा स्मरण दिन आहे.१८८६ साली अमेरिकेतील शिकागो शहरात कामगारांनी आठ तासांच्या कामाच्या मागणीसाठी आंदोलन केले होते, ज्याच्या स्मरणार्थ हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

१८८६ साली कामगारांनी आपल्या हक्कांसाठी एकत्र येत अन्यायाविरोधात आवाज उठवला. त्यावेळी अनेक कामगारांना दिवसाचे १५-१६ तास काम करायला लावले जात होते, मात्र त्याच्या मोबदल्यात ना पुरेसा पगार मिळायचा, ना सुट्टी. या परिस्थितीला कंटाळून कामगारांनी एकत्र आंदोलन केलं आणि आठ तास कामाचा दिवस, योग्य वेतन व सुट्टी यांची मागणी केली.या लढ्याचं प्रतीक म्हणून १९८९ मध्ये मार्क्सवादी आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसने एक ठराव मंजूर केला. या ठरावात कामगारांसाठी दिवसातील ८ तासांपेक्षा अधिक काम न करण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर कामगारांच्या संघर्षाची आठवण ठेवण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांना सन्मान देण्यासाठी दरवर्षी १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून जगभर साजरा केला जाऊ लागला

ज्याप्रमाणे आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले त्याप्रमाणे महाराष्ट्राला स्वतंत्र राज्याचा दर्जा हा १ मे १९६० रोजी प्राप्त झाला. आणि तेव्हापासून या दिवसाला महाराष्ट्र दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. आणि योगायोग म्हणजे महाराष्ट्र दिनाच्या दिवशीच कामगार दिन सुध्दा असतो आणि तो सुध्दा ह्याच दिवशी साजरा करण्यात येतो.

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र महाराष्ट्र देश हा...
मंगल देशा! पवित्र देशा!
महाराष्ट्र देशा!



प्रणाम घ्यावा माझा हा,
श्री महाराष्ट्र देशा ।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर, जि.जळगांव.**
**मो. ८९९९५६६९१७**

## पान १ वरुन

### सरकारचा जातनिहाय ...

जातनिहाय जनगणनेऐवजी जातनिहाय सर्वेक्षण केलं. यूपीए सरकारच्या काळात काही राज्यांनी राजकीय दृष्टीकोनातून जातनिहाय सर्वेक्षण केल्याचं ते म्हणाले. जातनिहाय जनगणना मूळ जनगणनेत समाविष्ट झाली पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट अफेअर्सच्या बैठकीत जात निहाय जनगणनेला आगामी काळातील जनगणनेत समाविष्ट केलं जाईल. जातनिहाय जनगणना काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या लाभापर्यंत मर्यादित ठेवत होत, असंही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

**प्रकाश आंबेडकर काय म्हणाले?**

सुप्रीम कोर्टात या सरकारनं जातनिहाय जनगणना करु शकत नाही असं प्रतिज्ञापत्र सादर केलं होतं. आता कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातनिहाय जनगणना करु असं म्हणत आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

**काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले?**

केंद्र सरकारनं जर हा निर्णय घेतला असेल तर स्वागत आहे. हा निर्णय प्रचाराच्या पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. यासोबत आरक्षणाची मर्यादा वाढवण्यात यावी, अशी मागणी देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. संघानं आगामी काळात त्यांचा सरसंघचालक ओबीसी सम ाजातील करावा, असं देखील हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. सर्वांचा समावेश व्यवस्थेत असावा ही भूमिका आणि भावना आहे, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. दरम्यान, भारतात शेवटची जातनिहाय जनगणना १९३१ मध्ये झाली होती. आता आगामी लोकसंख्येच्या जनगणनेत जाती गणनेचा समावेश केला जाईल.

**सामाजिक न्यायाचं पर्व सुरू - फडणवीस**

मोदी सरकारने घेतलेला जातीय जनगणनेचा निर्णय अतिशय ऐतिहासिक प्रकारचा निर्णय आहे. भारतामध्ये १९३१ नंतर पहिल्यांदा जातीय जनगणना होत आहे. यापूर्वी मनमोहन सिंग यांच्या सरकारने जातीय जनगणना आम्ही करणार अशा प्रकारचे निर्णय केला. पण त्याच्याच मंत्री मंडळात विरोध झाल्याने त्याला ड्उ उउ मध्ये कन्व्हर्ट केलं. जनगणनेच्या ऐवजी ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सर्वे केला आणि त्याचे आकडे कधीच प्रकाशित झाले नाही. सामाजिक न्याय शेवटच्या घटकापर्यंत पोचवायचा असेल या जनगणनेच्या माध्यमातून समाजामध्ये कोण मागे राहिला आहे, याचा इम्पेरिकल डेटा सुद्धा येईल. त्यामुळे योग्य लोकांना योग्य सवलती देऊन या देशाला आणि समाजाला पुढे घेऊन जाता येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले. काँग्रेस पार्टीने गेली अनेक वर्षे अशा प्रकारची मागणी होत असताना कधीही मान्य केली नाही. केवळ राजकारण करत राहिले, आता मोदींनी मान्यता दिल्यामुळे सामाजिक न्यायाचं नवीन पर्व सुरू झाला आहे, असेही फडणवीस यांनी जातनिहाय जनगणनेवर बोलताना म्हटले.

### वेव्हज् परिषदेच्या ...

एक लाखांहून अधिक नोंदणी झाली. वेव्हज् २०२५ परिषदेमध्ये ९० हून अधिक देश, १०,००० प्रतिनिधी, १,००० कलाकार, ३०० हून अधिक कंपन्या आणि ३५० हून अधिक स्टार्टअप्स सहभागी होणार आहेत. शिखर संमेलनात ४२ मुख्य सत्रे, ३९ विशेष सत्रे आणि ३२ मास्टरक्लासेस आयोजित करण्यात येणार आहेत, ज्यामध्ये ब्रॉडकास्टिंग, इन्फोटेन्मेंट, एव्हीजीसी- एक्सआर चित्रपट आणि डिजिटल मीडिया यांसारख्या विविध क्षेत्रांचा समावेश असेल.

# अश्विनी वानखेडे हिचा सत्कार

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील सावरखेडा गोंधन या गावचे असणारे भूमिपुत्र श्री मिलिंद राजाराम वानखेडे व सौ वंदना मिलिंद वानखेडे यांची कन्या कुमारी अश्विनी वानखेडे ही ची नुकतीच नरसिंग ऑफिसर पदी शेगाव या ठिकाणी नियुक्ती झाल्याबद्दल तिचा गुणगौरव व नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी महाराष्ट्र राज्य गोरक्षण सेना प्रदेशाध्यक्ष तथा दि मेंबर्स ऑफ धर्म संसद नवी दिल्लीचे प्रवक्ते हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर महाराज वायाळ पाटील यांच्या शुभहस्ते अश्विनी ताईचा शाल श्रीफळ बुके आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील संघर्षगाथा बुक देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कुमारी अश्विनी यांनी या विजयाचे पूर्ण श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माझे शिक्षक गुरुवर्य आणि म ाझे जन्मदाते आई वडील यांना मी समर्पण करते असे भावनिक उद्गार अश्विनी ताईने यावेळी काढले याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना नंदकिशोर महाराज वायाळ पाटील म्हणाले की या यशाच्या पाठीमाग आई-वडील यांचा सिंहाचा वाटा आहे हे तो विसरू नको तुझ्या आई-बाबांनी मोलमजुरी करून तुला शिकविले आहे वेळप्रसंगी तुझ्या इच्छा पूर्ण करण्यासाठी गावाची भटकंती केली गाव सोडून बाहेरगावी शिक्षणासाठी पलायन केले आणि तू ते स्वप्न मनाशी बाळगून अभ्यासाच्या जोरावर आज नर्सिंग ऑफिसर पदी विराजमान झाली ही स्वाभिमानाची गोष्ट आहे आणि अश्विनी वानखेडे ही या गावांमधील पहिलीच महिला तरुणी आहे की जिने ही सरकारी पोस्ट लग्नाच्या अगोदर मिळविले आहे हे आपल्या गावासाठी व परिसरासाठी आनंदाची व स्वाभिमानाचे बाब आहे असे गौरव उद्गार याप्रसंगी वायाळ महाराज यांनी व्यक्त केले विशेषतः अनमोल जन्म दिला ग आई तुझे उपकार फिटणार नाही यावेळी आई वडील माझे थोर काय सांगू त्यांचे उपकार जीवनाच्या वाटेवरती किती असतो त्यांचा आधार नवीची चांदणी तू ग चंद्राची कोर शितल तुझी छाया मला हवे जीवनभर तुला घडविण्यासाठी या आई-बाबांनी कठोर परिश्रम घेतले आहेतळपत्या उन्हात आणि रखरखत्या रानात राहिलीच माझ्यासाठी तू ग कष्टाच्या घामात कधी मिळेल मुठभर घास कधी घडे तिला उपवास ओल्या म ातीतून चालताना तुडविले काट्याचे फास असा खडतर प्रवास त्यांनी केला तेव्हा हे सोन्याचे दिवस पाण्यासाठी आज मिळाले असे भावनिक विधान वायाळ महाराज यांनी व्यक्त केले हा प्रसंग सांगत असताना उपस्थितांचे माता-भगिनीचे पाण्याने डोळे



डबडबले होते या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून ब्रह्मपुरीचे एच एम निमसे सर श्री वाघमारे सर श्री अनिल वाकोडे श्री हरिदास पाटील वायाळ खंडू पाटील वायाळ प्रतिभा पाटील वायाळ सरपंच यांच्यासह वस्तीवरील सर्व महिला पुरुष तरुण मंडळी यावेळी आवर्जून उपस्थित होते माझी मुलगी हे सामान्य कुटुंबातून मोठी झाली याबद्दल गावातील प्रसिद्ध शिव कथा प्रवक्ते नंदकिशोर महाराज यांची सुकन्या कुमारी विजया नंदकिशोर वायाळ तिनेही यावेळी आपले विचार व्यक्त करून अश्विनीताई ने गावाचे नाव कमी झाल्याबद्दल तिचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी अनेकांनी हारतुरे फुलाचे उधळण करून आनंद व्यक्त केला याप्रसंगी वानखेडे परिवाराकडून वस्तीसाठी आलेल्या पाहुण्यारावण्यासाठी खीर वाटून व अन्नदान देऊन एक प्रकारे अलौकिक आनंद व्यक्त केला अश्विनीने सामान्य कुटुंबातून आपलं अस्तित्व निर्माण केले तिचा आदर्श आपण समाज बांधवांनी घेऊन त्याचे अनुकरण करावे असे मतही यावेळी वायाळ महाराज यांनी याप्रसंगी व्यक्त केले

### सह्याद्री हॉस्पिटलमध्ये आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ

# गरजूंनी योजनेचा लाभ घ्यावा - आ. संतोष दानवे

जालना (प्रतिनिधी) - जालना शहरातील सह्याद्री हॉस्पिटलम ध्ये मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांच्या हस्ते आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा एकत्रित शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमास भाजपा जालना जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. विजय भुतेकर, हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रताप घोडके, आरोग्यमित्र निखिल मगर, अमर उढान, तनुज घोडके आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. संतोष दानवे म्हणाले की, आज सह्याद्री हॉस्पिटलमध्ये आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा एकत्रित शुभारंभ होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या या योजनांम ुळे गरजू, गोरगरीब जनतेला मोठा आधार मिळणार आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. गरीब कुटुंबांना केवळ आर्थिक अडचणीमुळे योग्य उपचारांपासून वंचित राहावे लागते, या योजनेमुळे हजारो कुटुंबांना वर्षाकाठी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे, ही खरोखरच एक मोठी क्रांती आहे. या योजनांचा जास्तीत जास्त गरजू लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. प्रताप घोडके म्हणाले की, या योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्णांना वर्षातून प्रत्येकी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सेवा मिळणार आहे. यात १३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व उपचारांचा समावेश असून, नागरिकांना कोणतीही आर्थिक अडचण न होता आधुनिक वैद्यकीय सेवा मिळणार आहे. योजनेच्या पात्रतेसाठी आयुष्मान कार्ड, रेशन कार्ड,आधार कार्ड ही कागदपत्रे आवश्यक असून, ही सेवा 'विकसित भारत - निरोगी भारत' या संकल्पनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य लोकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे डॉ. प्रताप घोडके यांनी सांगितले.

# कामगार चळवळीचा इतिहास

**१ मे,या जागतिक कामगार दिनानिमित्त विशेष लेख. लेखक हे गेली ४० वर्षे कामगार चळवळीत सक्रिय आहेत. सर्व कामगार बंधूंना कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.**

**- संपादक**

१ मे हा दिवस जागतिक कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. शिकागोतील कामगारांनी ११८ वर्षापूर्वी कामाचे तास कमी करण्यासाठी केलेल्या आंदोलनात काही कामगार हुतात्मा झाले . त्यांचे स्मरण म्हणून जगातील कामगारांनी १ मे १८९० पासून हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा करण्यात येतो .

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेत उद्योगधंद्याची भरभराट होत होती. नवनवीन कारखाने उभे राहत होते. तुटपूजा पगारात काम गारांना १२ ते १६ तास काम करावे लागत होते. कामाची स्थिती चांगली नव्हती वैयक्तिक जीवन जगण्यासाठी कामगारांना वेळ मिळत नव्हता. काम ाचे तास कमी करावे, या मागणीसाठी कामगार थोड्या प्रमाणात संघटित होण्याचा प्रयत्न करीत होते. १८६६ च्या दरम्यान जिनिव्हा येथे भरलेल्या फर्स्ट इंटरनॅशनल वर्किंग असोसिएशनचे आठ तासांच्या कामाचा प्रस्ताव मांडलेला होता. तसंच ऑगस्ट १८६६ मध्ये नॅशनल लेबर युनियनने आठ तासांच्या कामाची मागणी केलेली होती. अमेरिकन सरकारने १८६८ मध्ये जरी आठ तासांचा कायदा केलेला होता, तरी मालक त्याची दखल घेत नव्हते, १८८० च्या मध्या मध्यास शिकागो न्यूयॉर्क बाल्टीपोर वगैरे औद्योगिक क्षेत्रात कामगारांनी आठ तासांच्या कामाच्या मागणीचा जोर लावून धरला होता.

१८८६ मध्ये अमेरिकेत आठ तासांच्या मागणीसाठी निदर्शने, मोर्चे, संप यांची लाट उसळली होती. १ मे ते ३ मे या दिवसात शिकागोतील हे मार्केट भागात हजारो कामगारांनी संप आणि निदर्शनांचा सपाटा लावला होता. आठ तास काम ,आठ तास आराम आणि आठ तास कला, विज्ञान ही कामगारांची प्रमुख घोषणा होती. अमेरिकन फ ेडरेशन ऑफ लेबर या संस्थेने १८८६ च्या १ मे पासून आठ तासांच्या दिवसासाठी लढा देण्याचा आपला निर्धार जाहीर केला. या निर्णयाचे अमेरिकन कामगारांनी मोठ्या उत्साहाने स्वागत केले. १ मे १८८६ या दिवशी संपूर्ण अमेरिकेतील कारखाने बंद होते. ५ लाख अमेरिकन कामगार संपात सहभागी झाले होते. कारखान्यांनी गजबजलेले शिकागो हे शहर संपाचे प्रमुख केंद्र होत. चाळीस हजार कामगारांनी रस्त्यावर येऊन निदर्शने केली. पोलिसांनी निदर्शकावर गोळीबार केला. यात सहा कामगार ठार झाले. या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी एका चौकात ४ मे रोजी कामगारांनी एक शांततापूर्ण निदर्शने केली. त्यावर बॉम्ब फ ेकण्यात आला आणि दंगल होऊन सात पोलीस व कामगार ठार झाले. या संधीचा फायदा घेऊन पोलिसांनी निदर्शकावर क्रूर हल्ला केला. कामगार संघटनांची कार्यालये उध्वस्त केली. पुरोगामी काम गार नेते अल्बर्ट आर, पार्ससन्स, अगस्ट स्पाईज, सॅम्युएल जे, फिल्डने, युजिंग श्वाब, एडॉल्ड फिशर, जॉर्ज एंगेल, लुई बाग तसेच ऑस्कर निबे आदी कामगार नेत्यांना अटक करून त्यांच्यावर खटले दाखल करण्यात आले. त्यांच्यावर खुनाचे आरोप ठेवण्यात आले. मात्र एक फिल्डन वगळता इतर नेते बॉम्ब फेकण्यात येण्यापूर्वीच चौकातून निघून गेले होते. न्यायालयाने सात नेत्यांना फाशीची सजा सुनावली आणि आठवे नेते ऑस्कर निबे यांना १५ वर्षाची कारावासाची शिक्षा ठोठावली. या नेत्यांना फासावर चढविले जाण्याचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसे या नेत्यांना वाचविण्याच्या आंदोलनाचे लोन अमेरिकेच्या बाहेर पसरू लागले होते आणि जगभरातून फाशीची सजा रद्द करण्यात यावी यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढू लागला होता. या विरोधी मोहिमेमुळे इलिनवासच्या गव्हर्नरला फील्डन आणि शॉब यांच्या फाशीच्या सजेचे रूपांतर जन्मठेपेत करावे लागले. फाशीच्या एक दिवस अगोदर वयाने सर्वात लहान असणाऱ्या लुई लीग यांनी आत्महत्या केली. अर्थात ही हत्या होती की आत्म हत्या हे कोणालाही समजू शकलेले नाही. ११ नोव्हेंबर १८८७ ला अल्बर्ट पारसन्स, अगस्त स्पायजे, जॉर्ज एंगेल आणि एडॉल्फ फिशर आदी नेत्यांना फासावर लटकविण्यात आले. त्याने धाडसाने मृत्यूला कवटाळले. या घटनेची आणि या हुतात्म्यांच्या स्मृती प्रित्यर्थ १ मे हा दिवस जगभरात सर्वत्र कामगार वर्गाचा आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून मानला जाऊ लागला.

जगातील सर्व धर्माच्या, सर्व जातीच्या, सर्व राष्ट्रांच्या आणि सर्व वर्णाच्या कामगारांच्या एकजुटीचा दिवस म्हणजे १ मे हा दिन कामगार दिन. या दिवशी जगाच्या कानाकोपऱ्यातले कामगार, सर्व शहरातले कामगार लहान मोठ्या कारखान्यातले कामगार हा दिवस सुट्टीचा, सणाचा आणि लढाऊ एकजुटीचा दिवस म्हणून पाळतात. जेवढे श्रमजीवी तेवढे एकही भावना रस्त्यावर प्रचंड मिरवणुका काढून व्यक्त करतात.

आज मॉस्को, लंडन, बर्लिन, पॅरिस. न्यूयॉर्क, म ुंबई. कलकत्ता, रिओ द जानोरी, टोकियो, हनोई, हवाना, पेकिंग आदी जगातील सर्व शहरात कामगार रस्त्यावर येऊन आपल्या एकजुटीचे निदर्शक झेंडे, आपापल्या युनियनचे झेंडे घेऊन मिरवणुका काढतील आणि जगातील उरल्या सुरल्या भांडवलदारांना, सर्व शोषकांना, सर्व फूटपाड्यांना बजावून सांगतील की, आता तुमचे दिवस संपले, आम्ही ते संपविणार आणि साऱ्या दुनियेवर आम च्या गुलामगिरीचा अंत करणार, खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वतंत्र होणार. साऱ्या मानव जातीला स्वतंत्र करणार. बॉम्ब स्फोटाशी काही संबंध नसताना शिकागो मधील पाच कामगार नेत्यांना फाशी देण्यात आलं होतं.

दरम्यान शेजारच्या राष्ट्रांमध्ये कामाच्या तासासंबंधी चळवळ पसरत होती.१४ जुलै १८८९ ला भरलेल्या सेकंड इंटरनॅशनलने १ मे १८९० हा दिवस शिकागोतील कामगारांचे स्मरण म्हणून जागतिक कामगार दिन मानला जावा असा प्रस्ताव मंजूर केला. तेव्हापासून हा दिवस कामगार दिन म्हणून जगभर साजरा होतोय. फ्रान्स, ब्रिटन. इटाली, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, पोर्तुगाल हंगेरी जर्मनी वगैरे देशातील कामगारांनी १ मे १८९० ला निदर्शने, मोर्चे, संप अधिवेशन घेऊन पहिला



आंतरराष्ट्रीय कामगार दिन साजरा केला.

मे दिन साजरा करण्याच्या जगभरच्या तऱ्हा मात्र वेगवेगळ्या आहेत. काही देशात सरकार विरोधी आवाज उठून हा दिवस साजरा केला जातो. पोर्तुगालमध्ये १८७४ कामगारांनी सरकार विरुद्ध आवाज उठवला होता आणि ४५ वर्षाची जुलमी राजवट उलथून टाकली. ब्राझीलमध्ये कामगार संघटना खिळखिळ्या करणाऱ्या कठोर कायद्याविरोधी १९८० मध्ये एक लाख कामगारांनी संप पुकारला होता. दुसऱ्या एका अमेरिकन राज्यात दीड लाख कामगारांनी मोर्चे काढून सैन्याच्या जुलुमाविरुद्ध आवाज उठविला होता.

भारतात १९२७ पासून मे दिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली. भारतातील पहिला कामगार दिन १९२७ साली देशातल्या कामगार चळवळीचे नेतृत्व करीत असलेल्या मुंबईच्या कामगारांनी साजरा केला होता. तेव्हापासूनच आजपर्यंत भारतीय कामगार चळवळीचा इतिहासही गौरवशाली असाच आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत भारतातला कामगार इतर साम्राज्यशाही विरोधी शक्तींच्या खांद्याला खांदा लावून लढला. १९४६ साली तर मुंबईच्या रस्त्या रस्त्यावर नाविक सैनिकांच्या खांद्याला खांदा लावून तो लढला आणि ब्रिटिशांचे भारतातले साम्राज्य नष्ट केले .

भारतात पहिले कारखाने १८५२ च्या सुमारास निघाले. १८८० सालापर्यंत तब्बल एक पिढी उलटून जाईपर्यंत औद्योगिक क्षेत्रात फक्त जंगली कायदाच नांदत होता. कामाचे तास १२,१६,१८ आणि कधी कधी त्याहूनही जास्त असत. रविवारची रजा, सुट्ट्या, कामाच्या ठराविक वेळा, यातले काही नव्हते. पाच पाच, सहा सहा वर्षाच्या म ुलांकडून मोठ्या माणसांप्रमाणे काम करून घेतले जाई. मुले मशीनमध्ये सापडून जायबंदी झाली तरी त्यांची यत्किंचितही दादफिर्याद कोण घेत नसे. अल्पवयीन मुलाप्रमाणेच महिला व वयोवृद्ध काम गार यांच्यासाठीही कामाच्या वेळेत व इतर बाबतीत कोणत्याही सवलती नव्हत्या. कामाचे जबर तास आणि अत्यंत तुटपुंज वेतन यांच्या जोरावर आपले देशी भांडवलदार मालाच्या भावात इंग्रजी भांडवलदारांची यशस्वी स्पर्धा करू लागले आणि म्हणून इंग्रजी भांडवलदारांनीच हिंदी कामगारांच्या अमानुष शोषणाविरुद्ध ब्रिटिश सरकारकडे तक्रार केली. यासाठी कमिशन नेमण्यात आले. त्यानंतर कामगारांना रविवारची रजा मिळाली. सात वर्षाखालील मुलांना कामावर ठेवता कामा नये म्हणून निर्बंध आले. अर्थात हे सर्व कागदावरच कारण मशिनरीची साफसफाई करण्याच्या नावाखाली कामगाराला रविवारीही कामावर बोलवले जाई आणि डॉक्टर कडून मुलांच्या वयाच्या हवे तसे सर्टिफिकेट मिळवले जाई

१८८१ साली तत्कालीन कामगार पुढारी आणि महात्मा ज्योतिराव फुले यांचे शिष्य

श्री नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबई गिरणी कामगार मंडळी ही भारतातील पहिली ट्रेड युनियन स्थापन केली. त्यांच्या प्रयत्नामुळे १८८१ साली हा फॅक्टरी ॲक्ट कामगार विषयक पहिला कायदा करण्यात आला.सात वर्षाखालील बालकांना काम करण्यास बंदी, ७ ते १४ वयोगटातील मुलांकडून सात तासाहून जास्त काम घेऊ नये.या मुलांना जेवणाची सुट्टी, अपघातापासून संरक्षण वगैरे सवलती जाहीर करण्यात आल्या.पुढे श्री नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नामुळे १८९१ साली फॅक्टरी ॲक्ट मध्ये सुधारणा करण्यात आल्या. त्यानुसार ११ तासाची ड्युटी, अर्धा तास जेवणाची सुट्टी, स्त्रियांना रात्र पाळीवर कामावर बोलवण्यास बंदी, ९ ते १४ वयाच्या मुलांना सात तासांची ड्युटी, साप्ताहिक रजा यासारख्या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. १९११ सालापर्यंत कामाच्या तासासंबंधी सरकारचे निश्चित असं काहीच धोरण नव्हतं. फुटकळ प्रमाणात प्रतिकार चालू असला तरी मजबुत अशी संघटित कामगार चळवळ नव्हती की, कामगारांच्या राष्ट्रीय पातळीवर संघटना नव्हत्या, तरीही असंतोषाचा परिणाम म्हणून १९११ साली फॅक्टरी ॲक्ट मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्यात आल्या.

पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात कामगारांनी संपाचे हत्यार वापरलं. १९१९ ते १९२० च्या दरम्यान कामाच्या तासाचे प्रमाण दहावर आणण्यात आले. त्यानुसार १९३४ साली फॅक्टरी ॲक्ट मध्ये बदल करण्यात आले. आठ तासांची मागणी चालूच होती. फेब्रुवारी १९२५ साली मुंबईत भरलेल्या आयटक च्या पाचव्या अधिवेशनात आठ तासांची मागणी करण्यात आली.

दुसऱ्या महायुद्धानंतर संप, निदर्शने वगैरे आंदोलनाचा परिणाम १९४६ साली कामाच्या आठ तासांची मागणी अखेर पूर्ण झाली. १९४८ साली फॅक्टरी ॲक्टमध्ये नव्याने बदल करून त्या मागणीला कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले. तेव्हापासून आजतागायत आपल्या देशातील काम गारांच्या कामाच्या तासात काहीही फरक पडलेला नाही. अशा रीतीने अमेरिकन कामगारांनी कामाचे आठ तास व्हावे या मागणीसाठी उग्र लढा लढविला आणि तीच मागणी भारतीय कामगारांच्या पदरात १९४६ साली म्हणजेच बरोबर ८० वर्षांनी पडली.

जगातील कामगारांनो एक व्हा असे आव्हान कार्ल मार्क्स यांनी केल्यानंतर जगातील सर्व काम गारांचे प्रश्न सारखे आहेत, आपल्या हक्कांसाठी आपल्याला लढलेच पाहिजे, या भावनेने पेटलेला कामगार मग संघर्षासाठी सिद्ध झाला. ज्या आस्थापनासाठी आपण आपल्या रक्ताचे पाणी करतो त्या आस्थापनाने आपली पिळवणूक करावी, येथे आपल्या विचारांना थारा असू नये, या गोष्टी कामगारांना पटत नसत. कामगार मग ते कुठलेही असो एकूणच त्याचे ध्येय एक असते आपल्या कामाशी इमान राखणे ,पडेल ते काम करणे व आपण जेथे काम करतो त्या आस्थापनाची भरभराट करणे. या तळमळीने प्रत्येक कामगार काम करीत असतो. वेळ पडली तर स्वतःच्या जीवही धोक्यात घालणाऱ्या कामगारांना मात्र त्या मोबदल्यात मिळते ती अस्थिरतेची चिरंजीव जखम.

आता गरज आहे,यावर कायम स्वरुपी उपाय योजना करण्याची.

**लेखन - मारुती विश्वासराव**
**संपादन - देवेंद्र भुजबळ**
**९८६९४८४८००.**

# माहोरा येथे आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उदघाटन



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** सरपंच गजानन भगवानराव लहाने यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय माहोरा येथे आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी उपसरपंच श्री बाबासाहेब दादाराव बोरसे ग्रामपंचायतचे सर्व सन्माननीय सभासद अंगणवाडी ताई आशाताई ग्रामपंचायत कर्मचारी ग्राम पंचायत अधिकारी श्री.आर बी दांडगे संगणक परीचालक श्री. विकास जाधव पत्रकार बांधव व गावातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.यावेळी नागरिकांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. सेवा हक्कदिनानिमित्त शपथ घेण्यात आली. यावेळी सरपंच श्री गजानन भगवानराव लहाने यांनी उपस्थितितांना मार्गदर्शन केले. माहोरा येथील ग्रामस्थांनी आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

## महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनिषा दांडगे, नायब तहसिलदार अनिल नव्हाते, सतिश तायडे व इतर कर्मचारी उपस्थित होते.







परशुराम जयंती मोठ्या उत्साहात करण्यात आली. संभाजी उद्यान ते गांधीचमन पर्यंत ही मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये महाकालेश्वर चा देखावा सादर करण्यात आला. (छायाचित्र किरण खानापुरे)






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.